# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


अतितात्काळ / तातडीचे

जा.क्र. विकाऔ/शिक्षण/२०१०/ २८०५

दिनाक:- 20 APR 2010

प्रति,
प्राचार्य/संचालक
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था
एमबीए/एमसीए अभ्यासक्रमांच्या संस्था.

विषय : प्रवेश क्षमतावाढ/नवीन अभ्यासक्रम सुरु करणे बाबत

उपरोक्त प्रकरणी कळविण्यात येते की,अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासुन प्रवेश क्षमतावाढ/नवीन अभ्यासक्रम सुरु करणे सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, या कार्यालयाने ज्या संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाल्याचे निर्दशनास आले आहे अशा संस्थांना दिनांक २२/४/२०१० रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्याविषयी लेखी कळविलेले आहे. तथापी ज्या संस्थांनी अशा आशयाचे प्रस्ताव सादर केलेले आहेत व ज्यांना या कार्यालयाकडून अदयाप लेखी पत्र प्राप्त झालेले नाही अशा संस्थांनीही सदर सुनावणीच्या वेळी अ.भा.तं.प.कडे सादर केलेला प्रस्ताव आणि विवरणपत्र सी (या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेले आहे) दिनांक २२/४/२०१० रोजी सुनावणीसाठी उपस्थित रहावे.

तसेच सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद यांच्या नावे तपासणी शुल्क भरणे आवश्यक असुन तपासणी शुल्क भरल्याशिवाय प्रस्तावाची शिफारस अ.भा.तं.प.कडे शिफारस करण्यात येणार नाही असे तंत्रशिक्षण मुंबई कार्यालयाने कळविले असुन सुनावणी पूर्वी या कार्यालयात तपासणी शुल्क भरण्यात यावे. अधिक माहितीसाठी तात्काळ या कार्यालयाशी दुरध्वनी/फॅक्स व्दारे संपर्क करावा.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद.

प्रत : या कार्यालयाच्या प्रोग्रॅमर यांना माहितीसाठी व तात्काळ कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दिसाठी.